*अत्यंत महत्वाचे*

जा.क्र.शिउसं/प्रशि-४/सूचनापत्र /पुवि/१२/ 8EV 82
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक- 16 NOV 2012

प्रति,

संस्था सचिव / अध्यक्ष
सर्व अनु./विनाअनु/ कायम विनाअनु अध्यापक विद्यालये,
पुणे विभाग.

विषय – प्रभारी प्राचार्य मान्यता प्रस्तावातील त्रुटीं बाबत...

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, प्रभारी प्राचार्य मान्यतेसाठी प्राप्त प्रस्ताव तपासले असता पुढील त्रुटी आढळून आल्या आहेत. तरी प्रस्ताव पाठविताना पुढील बाबी जोडल्याची खात्री करावी.

१. सर्वाधिक जास्त खपाचे दोन वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिल्याचे आढळून येत नाही.
२. दि.६/२/१२ चे शासननिर्णयानुसार जाहीरात दिल्याचे दिसून येत नाही. जाहीरात परिपूर्ण नाही.
३. एकाच कर्मचा-यास अनेक वेळा प्रभारी प्राचार्य मान्यता घेण्याचा प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास येते
४. मुलाखतीस उपस्थित राहणेसाठी नियमानुसार विहीत कालावधी दिल्याचे दिसून येत नाही.
५. प्राचार्य पद केव्हा पासून रिक्त आहे याचा उल्लेख ठरावात नमूद केलेला दिसून येत नाही.
६. एक्च व्यक्ती दोन ठिकाणी काम करत नाही असे हमी पत्र जोडलेले आढळून येत नाही.
७. मुलाखत घेणा-यांची यादी नांवासह जोडलेली दिसून येत नाही.
८. मुलाखतीस उपस्थित कर्मचा-याचा स्वाक्षरीसह तक्ता व मुलाखती नंतर नियुक्त कर्मचा-याचा गुणांकसह तक्ता जोडलेला दिसून येत नाही.
९. रोष्टर तपासणी करुन रोष्टर प्रमाणे भरती करण्याची कार्यवाही न करता प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येते.
१०. नियुक्ती बाबतचे ठरावाची परिपूर्ण प्रत जोडलेली दिसून येत नाही.
११. नियुक्त केलेले कर्मचा-याची अधिव्याख्याता मान्यता प्रत जोडलेली दिसून येत नाही.अस्पस्ट जोडलेली असते.
१२. संच मान्यता प्रत जोडलेली दिसून येत नाही.
१३. वरील सूचनांची अमंलबजावणी करुन प्रस्ताव सन १३-१४ चे दाखल होतील असे हमीपत्र रु.१०० चे स्टँप पेपर वर संस्थानी देणे आवश्यक राहील. सोबत हमी पत्राचा नमुना जोडला आहे.
१४. परिपूर्ण प्रस्ताव सादर होतील याची दक्षता घ्यावी.

16/11/12

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

-हमी पत्र -

१. संस्थेचे नांव -

२. संस्था अंतर्गत अध्यापक विदयालयांची नांवे –

३ संस्थापकांचे नांव –

४. अध्यापक विदयालय सुरु झाल्याचे वर्ष – १. एन.सी.टी.ई क्र. दि.
२.एस.सी.आर.टी पत्र तुकडी संख्या माध्यमनिहाय- विषयानुसार केव्हा तुकडी मंजूर झाली ते वर्ष ,पत्र दि.)
३. परिक्षा परिषदेचा सांकेतांक क्र.

(एका पेक्षा जास्त अध्यापक विदयालये असल्यास स्वतंत्र प्रत्येक कॉलेजचे हमीपत्र जोडावे)

आमच्या ...................................अध्यापक विदयालयाच्या प्रभारी प्राचार्य मान्यतेसंदर्भात श्री/श्रीमती.............................यांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. यापूर्वी संबंधिताचा प्रस्तावास ..........इतक्या वेळा आपल्या कार्यालयाची प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता घेण्यात आलेली होती.

सन २०१३-१४ मध्ये नियमित प्राचार्य भरण्यासाठी शासन नियमानुसार योग्य ते सर्व प्रयत्न करण्यात येतील याची हमी देत आहोत.

दिनांक -

अध्यक्ष/ सचिव
( स्वाक्षरी , नांव व शिक्यासह )